# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१४ / आग्रहनय २६, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **नियोजन मंत्री** | |
| **(२)** | **महिला आणि बालविकास मंत्री** | |
| **(३)** | **वित्त मंत्री** | |
| **(४)** | **वने मंत्री** | |
| **(५)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

### लातूर जिल्हा परिषदेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याबाबत

**(१) * ३२७९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लातूर जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून मिळणा-या उपकराच्या रकमेची वारंवार मागणी करूनही ती अद्याप देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपकराची रक्कम अद्याप न मिळण्याची कोणती कारणे आहेत,
(3) असल्यास, लातूर जिल्हा परिषदेची आर्थिक परिस्थिती बिकट असूनही राज्यशासनाकडून ही रक्कम देण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अशंत: खरे आहे.
लातूर जिल्हा परिषदेची जमीन महसूल उपकराची मार्च, २०१२ अखेर थकबाकी रु. २३,१४,५५,०९०/- इतकी होती. सदर थकबाकीपैकी सन २०१२ - १३ मध्ये रु. ४,३१,५८,७००/- व सन २०१३-१४ मध्ये रु. ९,५१,४५,४३९/- असे एकूण रु. १३,८३,०४,१३९/- इतके अनुदान लातूर जिल्हा परिषदेला देण्यात आले आहे. उर्वरित अथबाकी देण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

### ठाणे जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने हाती घेतलेली नुतनीकरण करण्याची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ३५६७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने सन २०१२-१३ मध्ये सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याकरिता तलाव दुरुस्ती, कोल्हापूरी बंधारे, देखभाल दुरुस्ती, गाव तलाव नुतनीकरण, पाझर तलावाचे नुतनीकरण करण्याकरिता सुमारे साडेचार कोटीची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची कामे वाटप करण्यात येऊनही अद्यापही कामांना सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची कामे अद्यापपर्यंत सुरु न करण्याची कारणे काय आहेत याची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) सदरची कामे किती कालावधीत पूर्ण होणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) होय.
ठाणे जिल्हा परिषद स्वनिधीतून सन २०१२-१३ मध्ये दुरुस्ती कामांसाठी रुपये ४.३० कोटीची तरतुद करण्यात आली होती.
(2) हे खरे नाही.
सनर २०१२-१३ या वर्षात देखभाल दुरुस्तीच्या एकूण ४० कामांपैकी ३९ कामे पूर्ण झालेली आहेत.
(3), (4) व (5) पश्र उद्‌भवत नाही.

-----------------

**पंचायत समिती खामगांव (जि.बुलडाणा) अतंर्गत असलेल्या ग्राम सेवकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत**

**(३) * ९२९ श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पंचायत समिती खामगांव (जि.बुलडाणा) अतंर्गत किती ग्रामसेवकांच्या जागा रिक्त आहेत,
(2) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्रामसेवकाला 3-3 गावांचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, एका ग्रामसेवकाला अतिरिक्त प्रभार दिल्यामुळे त्यांच्या मुळ गावांतील विकास कामे रेंगाळत आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, शेतक-यांना बँकाचे कर्ज काढण्याकरिता 7/12 चे उतारे व शासनाचे इतर दाखले मिळण्यसाठी त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, या ग्राम सेवकांच्या असलेल्या रिक्त जागा भरण्याकरिता गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी शासनाकडे मागणी संबंधिचा प्रस्ताव पाठविला आहे काय,
(6) असल्यास, सदर पदे लवकरात लवकर भरण्याबाबत संबंधितांना आदेश देणार आहात काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) खामगांव पंचायत समिती अतंर्गत ग्रामसेवक संवर्गाची एकूण ६८ मंजूर पदे असून रिक्त ८ पदे आहेत.
(२), (३) व (४) गावातील विकासकामे तसेच ग्रामपंचायतीचा कार्यभार सुरळीत चालण्याच्या दृष्टीने तुलनात्मकदृष्ट्या हलका कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांकडे रिक्त पदाचा कार्यभार सोपविला असल्याने विकासाची कामे रेंगाळली नाहीत व दाखले मिळण्याबाबत अडचणी निर्माण झालेल्या नाहीत. शेतक-यांना ७/१२ चे उतारे तलाठ्यांकडून देण्यात येतात.

(५) व (६) ग्रामसेवकांच्या पद भरतीची प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत असते. त्यानुसार गट विकास अधिका-यांकडून रिक्त पदांबाबतचे प्राप्त अहवाल विचारात घेऊन जिल्हा निवड समितीद्वारा १२ ग्रामसेवकांच्या पदभरतीसाठी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी परिक्षा घेण्यात आलेली असून उपलब्ध अमेदवारांमधून खामगांव पंचायत समिती अतंर्गत रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न आहे.

-----------------

**सावली येथे उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग आणि सिंचाई विभाग , जिल्हा परिषद, चंद्रपूर हे कार्यालय सुरु करण्याच्या मागणीबाबत**

**(४) * ३०२८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) चंद्रपूर जिल्हयातील सावली तालूक्याची निर्मिती होवून 22 वर्ष झाले असतांना सुध्दा सावली येथे अद्यापही उपविभागीय अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर आणि उपविभागीय अभियंता सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर विभाग हे कार्यालय सुरु झाले नसल्यामुळे तालूक्यातील विकास कामे करण्यास नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याने सावली येथे उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर हे कार्यालय सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांच्याकडे दिनांक 24 नोव्हेंबर, 2014 च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग आणि उपविभागीय अभियंता, सिंचाई विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर ही कार्यालये सावली येथे तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येणार आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) ग्राम विकास विभागात अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(2) शासन निर्णय क्र. रागांपं-२०१४/प्र.क्र.१४२/ योजना-४ दिनांक १ ऑगस्ट, २०१४ व्दारे राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्राम पंचायत स्तरावर पंचायत अभियंता (प्रात ग्रामपंचायत) व गट अभियंता (प्रति पंचायत समिती) ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निर्माण करण्यात आलेली पदे विचारात घेऊन तसेच जिल्हा परिषदांकरिता उपलब्ध विभाग/उपविभाग, तांत्रिक मनुष्यबळ व कार्यभार विचारात घेऊन आवश्यक विभाग व उपविभाग निर्माण करण्याच्या जिल्हा परिषदांच्या प्रस्तावांचा आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी सर्व जि.प.ना. कळविण्यात आले आहे. तथापि,

सर्व जिल्हा परिषदांकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यानतर नवीन विभाग/ उपविभाग व आवश्यक कर्मचारीवृद निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमारे ठेवण्यात येईल,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरिवली (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात (नॅशनल पार्क) छटपूजेच्या निमित्ताने वनसंरक्षणाचे नियमांचे उल्लंघन केल्याबाबत**

**(५) * ३४२० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) बोरिवली (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उदयानात (नॅशनल पार्क) छटपूजेच्या निमित्ताने वनसरक्षणाचे सगळ्या नियमांचे उल्लंघन केले असल्याचे दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील छटपूजेवेळी प्राण्यांना मारझोड करुन पर्यटकांनाही शिवीगाळ करण्यात येऊनही येथील वनाधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असता संबंधित वनधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येणार आहे,
(4) अदयाप, याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (1) हे खरे नाही.
(2), (3) व (4) अशा प्रकारची घटना घडल्याचे निदर्शनास आले नाही त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना अभयारण्यातंर्गत मळे, कोळणे, पाथरपुंज या गावांचे अद्यापही पुनर्वसन न झाल्याबाबत**

**(६) * २९८१ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पाटण (जि. सातारा) कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातंर्गत मळे, कोळणे व पाथरपुंज ही तीन गांवे प्रकल्पग्रस्त असून या गांवातील ग्रामस्थ व महिला गेली अनेक वर्षे जीव मुठीत घेवून जीवन जगत आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, बाधित गावांनी आमचे मतदारसंघातच पुनर्वसन करावे याकरीता शासनाकडे अदयावत प्रस्ताव सादर केला असून सन १९८६ पासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षत असणारे बाधित प्रकल्पग्रस्तांचे अदयापही पुनर्वसन झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्तबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अदयाप याबाबत शासनाने निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (1) हे खरे नाही.
(2) हे खरे आहे.
(3) सदर गावांचे पुनर्वसन करण्याकरिता पर्यायी जमीन शोधणे व गावांच्या मुलभूत माहितीचे संकलन चालू असून पुनर्वसन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

-----------------

**निलंगा तालुक्यातील (जि. लातूर) बोटकुळ-होसूर या रस्त्याच्या कामाबाबत**

**(७) * १३०४ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) निलंगा तालुक्यातील (जि. लातूर) बोटकुळ-होसूर या रस्त्याची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली नसतानाही संबंधीत गुत्तेदाराने या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याचे दाखवून परस्पर देयके काढल्याचे माहे जानेवारी 2014 मध्ये वा त्या दरम्यान

निदर्शनास आले तसेच संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच उदगीर मोड ते आबेवाडी या रस्त्याचेही काम न करता 1 लाखाचे देयके काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) चौकशी नुसार बोटकूल ते होसूर या रस्त्याचे कामात रु.८१,९१४/- चा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी संबंधित कनिष्ठ अभियंता श्री.एस.एम.थेटे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

-----------------

### लाखेगांव (ता. पैठण, जि. औरंगाबाद) येथील साखळी सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्णतः निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार

**(८) * ३४९६ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लाखेगांव (ता. पैठण, जि. औरंगाबाद) येथील साखळी सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्णतः निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे माहे जुलै, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(3) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, उपविभागयी कृषि अधिकारी, औरंगाबाद यांनी चौकशी केली असून त्यात काम निकृष्ट असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(३) सदर काम पाडून, नवीन चांगल्या दर्जाचे काम करण्याचे ठेकेदारास आदेशीत करण्यात आले आहे, सदर कामाचे कोणतेही देयक ठेकेदारास अद्याप अदा करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

### यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत घेतल्या जाणा-या परिक्षत झालेला गैरव्यवहार

**(९) * १७४१ श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे संगनमताने वर्ग 3 च्या कर्मचारी भरतीबाबत घेतल्या जाणा-या परिक्षचे पेपर फुटून या प्रकरणात

सुशिक्षित बेरोजगार परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांकडून अधिकारी व कर्मचा-यांनी लाखो रूपये घेतले व पेपर फोडले प्रश्न पत्रिका वितरित केल्या ही घटना माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या नुसार संबधीत व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाचे स्तरावर चौकशी सुरु आहे. तसेच पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद शहर यांचेकडे गुन्ह्याची नोंद झाली असून याबाबत पोलीस तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईचे उपनगरे तसेच राज्यातील आणखी काही ठिकाणच्या मिळून सुमारे 2.6 लाख हेक्टर वनजमीनीवरील खाजगी असल्याचा बांधकामे ओक्षप घेऊन जमीनदोस्त करण्याचा निर्णय**

**(१०) * ३५०९ श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईचे उपनगरे विशेषत: विक्रोळी, नाहूर, भांडूप, मुलुंड, माहूल,कांदिवली, बोरीवली आणि ठाणे शहराचा बराच मोठा भाग तसेच राज्यातील आणखी काही ठिकाणच्या मिळून सुमारे २.६ लाख हेक्टर वनजमीनीवरील खाजगी बांधकामे असल्याचा ओक्षप घेऊन जमीनदोस्त करण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2)असल्यास, खाजगी वनजमिनीवर उभ्या राहिलेल्या इमारती व वसाहतीमध्ये वर्षानुवर्षे मुंबई उपनगरात राहण्याऱ्या 5 लाख व राज्यभरातील १५ लाख रहिवाशांवर शासनाने आकारलेला सुमारे १०० कोटी रुपयाचा दंड परत करावा असा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये शासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे वा सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** १) व २) हे खरे नाही.
३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**कदम वाक वस्ती, ग्रामपंचायत अतंर्गत लोणी काळभोर, पुणे येथे 15 एकर जागेवर संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांचा पालखी तळ विकसीत करण्याबाबत**

**(११) * ३३७५ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कदम वाक वस्ती, ग्रामपंचायत अतंर्गत लोणी काळभोर, पुणे येथे 15 एकर जागेवर संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांचा पालखी तळ विकसीत होणार आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू पालखी तळास मान्यता मिळूनही आजवर तळ विकसीत होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याची सर्व साधारण कारणे काय आहेत व हा तळ केव्हा पर्यंत विकसीत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अशंत: खरे आहे. कदम वाक वस्ती ग्रामपंचायत लोणी काळभोर ता.हवेली पुणे येथील ३.५६ हे.आर. क्षेत्रातील सरकारी गायरान जागेवर पालखी तळ आरक्षित करण्यात आले आहे.
(२) व (३) शा.नि.क्र.तीक्षवि-२०१०/प्र.क्र.१०९/का.1444, दि.12/9/2014 अन्वये श्री क्षेत्र देहू-आळंदी-पंढरपूर-भंडारा डोंगर पालखी तळ/मार्ग विकासाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली असून त्याअतंर्गत पालखी मार्ग मुक्कामांच्या ठिकाणी पालखी तळाकरिता आवश्यक भूसंपादान व विकासास शासनाने मंजूरी दिली आहे. सदर विकास आराखड्याची अमलबजावणी यंत्रणा विभागीय आयुक्त, पुणे हे आहेत. सुधारित आराखड्याच्या अनुषंगाने त्यांचेकडून सविस्तार प्रस्ताव प्राप्त करुन त्यास मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## निफाड (जि. नाशिक) तालुक्यात जनावरांवर व नागरिकांवर होणारे बिबट्याचा वावर

**(१२) * १२७९ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गोदाकाठच्या मांजरगांव, भुसे, चायेरी, बेरकडी, करंजगाव, सोनगाव, शिंगवे, कुरडगांव, कोठुरे, सुंदरपुर, जळगाव, काथरगांव व नांदुर मध्यमेश्वर या परिसरात बिबट्याने, जनावरावर व काम करणा-या नागरिकांवर हल्ला करण्याच्या घटना गत महिन्यापासुन वाढल्या असुन बिबट्याच्या भितीने या भागातील शेतकरी शेतावर जाण्यास धास्तावत असुन शेतीची कामे ठप्प झालेली असतानाही वन विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे, तसेच याकडे दुर्लक्ष करणा-या वन विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) सदर प्रश्नात नमूद केलेल्या गावांपैकी नाशिक वन विभागातील मौजे जळगाव ता.निफाड येथील श्री.सदाशिव बबन माळी व त्यांचा मुलगा कु.अभिषेक सदाशिव माळी, मौजे करजगाव येथील कु.ओम संतोष पावसे, मौजे कुरडगाव येथील श्री.सुभाष राजाराम काळे व श्री. कैलास पुंडलिक सोनवणे यांना बिबट्याने जखमी केले होते. जखमी इसमांवर खाजगी रुग्णालयात तसेच शासकीय रुग्णालयात तसेच शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आलेले आहे.

मौजे सुंदरपूर व मौजे जळगाव येथे बिबट्याने शेळीवर हल्ला केल्याने संबंधित शेळी मालकास नुकसान भरपाई अदा करयात आली आहे.

वन विभागाने याकडे दुर्लक्ष केलेले नाही.

(३) याप्रकरणी वन विभागाकडून बिबट्याचा वावरकमी करणे, संघर्ष टाळणे याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. गोदाकाठच्या गावांमध्ये ज्या ठिकाणी घटना निदर्शनास आल्या आहेत त्या ठिकाणी वनविभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी वेळोवेळी गस्त घातली आहे. व गावांमधील ग्रामस्थासोबत प्रबोधन केले आहे.

सदर प्रकरणी वन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी आवश्यक ती कार्यवाही केलेली असल्याने अधिकारी /कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील मुखेड वन परिक्षत्रांतर्गत रोप वाटीका**
**व वृक्ष लागवडीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१३) * ३६३१ श्री.सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नांदेड जिल्ह्यातील मुखेड वन परिक्षत्रांतर्गत असलेल्या रोप वाटीकेतून बोगसपणे रोप वाटल्याचे दाखवून (2013-14) पूर्वीची मोठे वृक्ष व निसर्ग निर्मित वृक्ष दाखवून लाखो रुपयांचा निधी गिळंकृत केल्याप्रकरणी वनपरिक्षत्र अधिकारी वनपाल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, कारवाईचे स्वरुप काय आहे,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापही कार्यवाही झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील 1212 अगंणवाड्यासाठी 24 कोटी रुपयांचा निधी देण्यात**
**येवूनही सदरहू अगंणवाड्याचे बांधकाम अद्यापी सुरु करण्यात आले नसल्याबाबत**

**(१४) * ३३९८ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नाशिक जिल्ह्यातील १२१२ अगंणवाड्यासाठी २४ कोटी रुपयांचा निधी देण्यात येवूनही सदरहू अगंणवाड्याचे बांधकाम अद्यापी सुरु करण्यात आले नसल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू अगंणवाड्यांचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाशिक जिल्ह्यात आदिवासी व ग्रामीण प्रकल्पंतर्गत सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये अनुक्रमे ११२५ + २९९ = १४२४ अगंणवाडी केंद्र इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती, सदर बांधकामापैकी १२१२ एवढ्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले होते. सदरची बांधकामे, बांधकाम विभाग, ग्रामपंचायत व प्रि फॅब्रीकेशन अतंर्गत ८८९ सुरु झालेली होती पैकी ८६१ बांधकामे पूर्ण झालेली आहेत. बांधकाम विभागाअतंर्गत सद्य:सिथतीत २८ कामे प्रगतीतील आहेत.
उर्वरित बांधकामे, साहित्याचे वाढते भाव, मजूरीची दरवाढ मंजूरसंस्थाचा बांधकामे घेण्यास अनुत्साह, जागा उपलब्ध न होणे, नगरपालिका हद्दीत अनुत्साह, जागा उपलब्ध न होणे, नगरपालिका हद्दीत वाढ इ. कारणामुळे पूर्ण होऊ शकलेली नाहीत.
(२) सदरहू २०१०-११ व २०११-१२ या वर्षातील अगंणवाडी बांधकामे रु.४.०० व ४.५० लक्ष प्रमाणे शासन निर्णय, दि. २० एप्रिल, २०११ अन्वये खर्चाची मर्यादा होती, तथापि, त्या खर्चाच्या मर्यादेत अगंणवाडी बांधकामे पूर्ण होऊ शकली नाहीत. अगंणवाडी केंद्र इमारत बांधकाम खर्चाच्या वित्तीय मर्यादेत वाढ करणेबाबत मोठ्या प्रमाणावर मागणी

झाल्याने शासन निर्णय दि. २९ जानेवारी, २०१४ अन्वये बिगर आदिवासी `क्षत्राकरिता रु. ४.५० लक्ष ऐवजी रु. ६.६० लक्ष अशी सुधारीत दराने वाढीस मंजूरी दिलेली आहे.
(३) प्रस्तुत शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१४ अन्वये वित्तीय खर्चाचे मर्यादेत वाढ केल्याने यापूर्वीचे १२१२ अगंणवाड्यांपैकी ३२३ अगंणवाडी केंद्रांची बांधकामे अदांपत्रकीय दर कमी असल्याचे कारणास्तव सुरु होऊ शकली नव्हती ती सर्व कामे रद्द करण्यात आलेली आहेत.

शासनाने सुधारीत वित्तीय मर्यादेत दिलेल्या मान्यतेप्रमाणे सुरु न झालेल्या कामांना प्राधान्याने निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**सावंतवाडी वन विभागाच्या मळगांव, नेमळे (जि.सिंधुदुर्ग)**
**सौरऊर्जा कंपाऊंड उभारणीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१५) * ३६७४ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सावंतवाडी वन विभागाच्या मळगांव, नेमळे (जि.सिंधुदुर्ग) सौरऊर्जा कंपाऊंड उभारणीच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सौरऊर्जा कुंपणाच्या कामासाठी सुमारे ७५ लाखाचा निधी खर्च करण्यात आला परंतु हया कामी ११ लाख ३० हजारच प्रत्यक्षात खर्च आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सौरकुंपण एवढे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने गवा, रेडयांना रोखण्यास कुचकामी ठरते आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या संपूर्ण कामाची चौकशी केली आहे काय,
(5) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** १) हे खरे नाही.
नेमळे येथे सौरऊर्जा कुंपणाचे काम करण्यात आले असून सदर कामात गैरव्यवहार झालेला नाही. तसेच मौजे मळगांव येथे सौरऊर्जा कुंपण करणेत आलेले नाही.
२) हे खरे नाही.
मौजे नेमळे येथील सौरऊर्जा कुंपणासाठी रक्कम रु.१७,६१,८२४/- इतक्या अदांजपत्रकीय अनुदान मंजूर करण्यात आले असून सदर अनुदानापैकी रक्कम रु.१६,३०,५७४/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.
३) हे खरे नाही.
४) प्रश्न उद्भवत नाही.
५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जिल्हा परिषद अतंर्गत सेस फंडातून**
**शासनामार्फत अपूरा निधी दिला जात असल्याबाबत**

**(१६) * २५७६ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील जिल्हा परिषद अतंर्गत सेस फंडातून कर्करोग, हृदयरोग आणि किडनीच्या दुर्धर आजाराकरिता अत्यंत तोकडा असा निधी शासनामार्फत देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या सर्व आजारांचा खर्च कितीतरी पटीने जास्त असतो त्यामुळे सदर निधी अत्यंत कमी असून त्यात वाढ करण्याची मागणी स्थानिक संस्थाचालकांनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त मागणीनुसार या निधीमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) हे खरे नाही.
जिल्हा परिषदेने आपल्या स्व:ताच्या निधीतून कॅन्सर, हदयरोग व किडनी अशा दुर्धर रोगाने पीडीत रुग्णांना आर्थिक मदत देण्याकरीता विहित केलेली तरतुदीची मर्यादा शासनाच्या दि. ८/२/२००७ च्या परिपत्रकानुसार काढून टाकलेली आहे. जिल्हा परिषदांनी स्थानिक विकासाच्या योजनासाठीच्या खर्चाचा विचार करुन सदर निधीची तरतूद करावयाची आहे.
(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अकार्यक्षम कारभाराबाबत**

**(१७) * ३३०३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या गलथान कारभारामुळे क्रीडा संकुल, शाहू सभागृहांच्या दुरुस्तीचे काम, पदाधिकारी निवासस्थांनाच्या आवारातील लॉन विना वापर 3 वर्षे पडून असणे, तसेच भाऊसिंगजी रोडवरील इमारतीचा आणि मुख्य प्रशासकीय इमारत विस्तारीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरची कामे तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(3) असल्यास, सदरची कामे केव्हापर्यंत पूर्ण होणे शासनास अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) अशंत: खरे आहे.
(2) व (3) 1) जि.प.ने सुरु केलेल्या निवासी क्रिडा प्रशालेअतंर्गत प्रथम 400 मी.ची.धावपट्टी तयार करणेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन मंडळ, कोल्हापूर यांचेकडे नाविन्य पुर्ण योजना अतंर्गत सन 2014-15 मधून प्रस्तावित केलेला आहे व त्यानुसार प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
2) राजर्षि शाहू छत्रपति जुने सभागृहाचे व्यासपीठ विस्तारीकरणाचे कामासह ध्वनी यंत्रणा व बैठक व्यवस्थेचे रक्कम रु.50 लक्षचे काम प्रगतीत असून सद्य:स्थितीत काम जवळ जवळ ७५% पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम जानेवारी २०१५ अखरे पूर्ण करणेचे नियोजन आहे.
3) रु.25 लक्ष खर्च करुन पदाधिकारी निवासस्थान परिसरातील लॉन दिनांक 19/9/2013 रोजी पुर्ण करण्यात आले आहे. तथापि सदर लॉनचा वापर भाडे तत्वावर करावयाचा असलेने त्यास स्थानिक महानगरपालिकेची परवानगी आवश्यक असल्यामुळे तसा प्रस्ताव स्थानिक महानगरपालिकेकडे सादर करुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

4) जिल्हा परिषद मालकीच्या १२७०.९० चौ.मी.जागेवर व्यापारी संकुलाचे इमारतीचे ठिकाणी नविन बहुमजली व्यापारी संकुलाची इमारत FBT (Finance Built & Transfer) तत्वावर बांधणेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जमिन मालकी हक्का संदर्भात माहिती जिल्हा परिषदेकडून मागविण्यात आली आहे.
(5) जि.प.च्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या विस्तारकरणातंर्गत 4 था मजल्याच्या सविस्तर अदांजपत्रकासह सुधारित प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर प्रगतीत आहे.

-----------------

**शेवगळ (जि.जालना) येथील सिमेंट बंधाऱ्याच्या अपुर्ण कामाबाबत**

**(१८) * ३०९८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) शेवगळ ( जि.जालना) येथील जटाशंकर नदीवरील सिमेंट बंधाऱ्याचे काम अपुर्ण असल्याची तक्रार तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांच्या विरोधात आयुक्ताकडे माहे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात स्थानिक ग्रामस्थांनी दिली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील बंधाऱ्याचे काम न झाल्यामूळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन नुकसान झाले असून तसेच सिंचन व्यवस्थाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**गटवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचला जबर मारहाण केल्याबाबत**

**(१९) * ३२१५ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) गटवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत दि. 20 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास सदस्य श्री.भरत गट यांनी ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचला जबर मारहाण, विनयभंग, व मंगळसूत्र तोडण्याचे घृणास्पद प्रकार केला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) होय.
(2) होय.
(3) याबाबत सरपंच श्रीमती कविता गट यांनी दि.१९.११.२०१४ रोजी पोलीस स्टेशन सुपा, ता. पारनेर येथे टी-१२८/२०१४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच श्री.

भरत सिताराम गट यांच्या गैरवर्तनाबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९(१) अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे सक्षम प्राधिकारी या नात्याने कार्यवाही सुरु आहे.
(4) प्रश्न उद्भावत नाही.

-----------------

**स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंअतंर्गत तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्राच्या बांधकामबाबत**

**(२०) * ३५२० श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअतंर्गत तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र तयार करणे हे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास,मौजा-मोहाडी (वडेगांव) (जि.भंडारा) येथे विक्री केद्राचे बांधकाम मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त विक्री केंद्राचे बांधकाम करण्याकरीता जागा उपलब्ध असूनही बांधकाम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(4) तसेच विक्री केंद्राच्या बांधकामाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे का,
(5) असल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) होय.
(2) होय.
(3) , (४) व (५) ग्राम पंचायत मौजा-मोहाडी (वडेगांव) येथील तालुका विक्री केंद्र बांधकामासाठी प्रस्तावित केलेली जागा जिल्हा ग्रामीण विकास, यंत्रणा, भंडारा यांचे नावे करण्याबाबत तहसिलदार मोहाडी यांनी दिनांक १४.११.२०१४ अन्वये जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर तालूका विक्री केंद्र बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा यांनी स्पष्ट केले आहे.

-----------------

**मुंबईतील प्राणी संग्रहालयाची दुरवस्था पाहता प्राण्याची देखभालीसाठी रिहेविलीटेशन केंद्र उभारण्याबबत**

**(२१) * १४५४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असून बिबट्यांचे खालावणारे आरोग्य तसेच भायखळ्यातील प्राणी संग्रहालयाची दुरवस्था पाहता गोरेगाव येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाऐवजी प्राण्यांच्या देखभालीसाठी रिहेबिलीटेशन केंद्र उभारण्याची पॉज या वन्यप्रेमी संस्थेने वनविभागाकडे माहे नोव्हेंबर, 2014 च्या दुसऱ्या आठवड्यात तसेच वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्ती प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन प्राप्त झालेले नसले तरीही केंद्रिय चिडीयाघर प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार नव्याने रेस्क्यु सेंटर उभारण्याचे काम अतिम टप्प्यात आहे. रेस्क्यू सेंटरची उभारणी पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी बंदिस्त बिबटे स्थलांतरीत करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई मालवणी, मालाड (पश्चिम) येथील बचत गटामार्फत अगंणवाड्यांना पोषण आहार पुरवठा करण्याच्या प्रक्रियेत गैरव्यवहार**

**(२२) * २३७६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई मालवणी, मालाड (पश्चिम) येथील बचत गटामार्फत अगंणवाड्यांना पोषण आहार पुरवठा करण्याच्या प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भ पाणलोट विकासांतर्गत पुसद वन विभाग (जि.यवतमाळ) अतंर्गत सुमारे 13 कोटी रूपयांची कामे कागदोपत्री झाल्याचे दर्शवून झालेला कोट्यवधी रूपयांचा आर्थिक घोटाळा**

**(२३) * ३९६ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पुसद (जि. यवतमाळ) विदर्भ पाणलोट विकासांतर्गत वन विभागामध्ये सन २०१०-११मध्ये सुमारे १३ कोटी रूपयांची कामे कागदोपत्री केल्याचे दर्शवून कामामध्ये आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्यानंतर धनादेशादवारे रक्कम प्रदान न करता प्रत्यक्षात रोखीद्वारे देतांना योजनेच्या कामामध्ये वनाधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रूपयांची आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याच्या तक्रारीवरून तब्बल चारवेळा चौकशी झाल्यानंतर दोषीवर कोणतीही कारवाई न झाल्याने प्रधान सचिव (वने) यांचेकडून माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी गैरव्यवहाराची नव्याने सखोल चौकशी करण्याचे व अहवाल सादर करण्यासाठी आदेश दिले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(3) तसेच उक्त प्रकरणी वारंवार चौकशी करण्याची नेमकी कारणे कोणती आहेत व अद्यापपावेतो शासनाकडे अनेकदा चौकशी अहवाल सादर झाल्यानंतर ही शासनाकडून कारवाई करण्यात आली नाही,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी वारंवारन तक्रारी होत असल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ कार्यालयातील विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांच्या अध्यक्षतेखालील पथकाने चौकशी करुन चौकशी अहवाल अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे सादर केला आहे. सदर अहवालाची छाननी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लांजा (जि. रत्नागिरी) ग्रामपंचायतीने सांडपाणी सोडण्यासाठी योग्य पर्यायी व्यवस्था केली नसल्याबाबत**

**(२४) * १४१७ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लांजा (जि. रत्नागिरी) शहराची झपाटयाने वाढ होत असून या ठिकाणी मोठ - मोठया इमारती बांधण्यात येत आहेत,हया इमारती बांधतांना ग्रामपंचायतीने इमारत बांधण्यास परवानगी दिल्या परंतु सांडपाणी सोडण्यासाठी प्लानमध्ये सुविधा दाखविण्यात आली नसल्यामुळे लांजावासियांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, ग्रामपंचायतीने इमारतीचे सांडपाणी सोडण्यासाठी योग्य पर्यायी व्यवस्था केली नसल्याने हे पाणी रस्त्यावर उघडयावर सोडले जात असल्यामुळे लांजा शहरात साथीने थैमान घातले आहे हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(4) तदनुसार यासंदर्भात शासनाने पुढे काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**टिटवाळा (जि. ठाणे) जवळील घोटसई, गुरवली व नडगांव परिसरातील वन जमिनीवर बेकायदा बांधकामे उभारीत असल्याबाबत**

**(२५) * ३५७२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) टिटवाळा (जि. ठाणे) जवळील घोटसई, गुरवली व नडगांव परिसरातील वन जमिनीवर बेकायदा बांधकामे उभारली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(3) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(4) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** १) अशंत: खरे आहे.

२) व ३) मौजे घोटसई येथील महसूल विभागाकडे हस्तांतरित केलेल्या संरक्षीत वनेक्षत्रात झालेल्या अतिक्रमणांकरीता महसूल विभागास कळविण्यात आले असून, त्यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

मौजे गुरवली येथे आढळलेल्या अतिक्रमकांविरुध्द वनगुन्हे नोंदवून न्यायालयात तक्रार दाखल केली असून, अतिक्रमणांविरुध्द कारवाई करुन अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हा परिषदेने कुपोषणमुक्तीच्या नावाखाली मागील वर्षी सुमारे ११ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब**

**(२६) * ३४२२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्हा परिषदेने कुपोषणमुक्तीच्या नावाखाली मागील वर्षी सुमारे ११ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्याय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणांत दोषी आढळून येणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (1) हे खरे नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाटण (जि.सातारा) कोयना अभयारण्याच्या गाभा `क्षत्रात अनाधिकृत फार्म हाऊस बांधली असलेबाबत**

**(२७) * २९८२ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पाटण (जि. सातारा) कोयना अभयारण्याच्या गाभा`क्षत्रात (कोअर झोन) मध्ये काही उद्योजकांनी अनाधिकृतपणे फार्म हाऊसची उभारणी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या उद्योजकांचे जीप, स्पीडबोट, जनरेटर व शेतघर संबंधित वन अधिकाऱ्यांने जप्त केले असून यासंदर्भात उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे परंतू न्यायालयाने सदरचा दावा फेटाळला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, अभयारण्याच्या`क्षत्रात अनाधिकृतपणे फार्म हाऊसची उभारणी करणाऱ्या उद्योजकांवर राज्य शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(5) असल्यास, शासन कोणती कारवाई करणार आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय, अद्याप याबाबत शासनाने निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही. कोयना अभयारण्याच्या`क्षत्रात तथापि सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील बफर`क्षत्रामध्ये (गाभा`क्षत्राबाहेर) मा.उच्च न्यायालयाने लावलेल्या बंदी आदेशाचे उल्लंघन करुन एका व्यक्तीने खाजगी`क्षत्रात बांधकाम केले आहे.
(२) सदर व्यक्तीची जीप, स्पीडबोड व शेतघर सील करण्यात आले आहे. या संदर्भात सिवील जज्ज, सिनीयर डिवीजन, कराड यांचे न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता परंतु न्यायालयाने सदरचा दावा फेटाळला आहे.
(३) व (४) होय, त्याचेविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ॲसिड फेकून चेहरा विद्रुप करणे, विनयभंग, व बलात्कार अशा अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना एफ.आय.आर.नोंद झाल्यावर आर्थिक मदत मिळण्याचा महिला व बालविकास विभागाने तयार केलेला प्रस्तावाबाबत**

**(२८) * १६५३ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) ॲसिड फेकून चेहरा विद्रुप करणे, विनयभंग व बलात्कार अशा अत्याचाराला बळी पडलेल्या महिलाना एफ.आय.आर.नोंद झाल्यावर आर्थिक मदत मिळण्याचा महिला व बालविकास विभागाने तयार केलेला प्रस्ताव मंजुरी अभावी नियोजन विभागाकडे प्रलंबित आहे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रस्तावांना राज्याचे नियोजन विभाग मंजुरी दिल्याशिवाय राज्यातील अत्याचार पिडितांना शासकीय आर्थिक मदत देणे शक्य नाही, सदरहू नियोजन विभागाने अशा प्रस्तावांना मंजुरी दिली अथवा देण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही. तथापि, अशा घटनांमधील पिडीत महिला व बालकांना अर्थसहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात दिनांक 21.10.2013 च्या शासन निर्णयान्वये मनोधैर्य योजना सुरु करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हा परिषदेअतंर्गत महिला आणि बालकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमात बोगस प्रशिक्षण देण्यात आल्याबाबत**

**(२९) * ३३७६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पुणे जिल्हा परिषदेअतंर्गत महिला आणि बालकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमात बोगस प्रशिक्षण देण्यात आले, हे खरे आहे काय,
(2) तसेच अनेक संस्थांनी खोटे दस्तऐवज सादर करुन प्रशिक्षणार्थ्यांची खोटी संख्या वाढवून प्रशिक्षण न देताच बिले सादर केली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरहू प्रकरणी तपासणी करण्यात आली आहे काय, तपासणीअती दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे
(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) व (३) रिजनल डायरेक्टर, रिजनल डायरेक्टर ऑफ ॲपरेटीसशिप ट्रेनिंग, मुंबई यांच्याकडून घेण्यात आलेल्या चाचणीमध्ये उत्तीर्ण असलेल्या व त्यांच्याकडील एकत्रित प्रमाणपत्र प्राप्त झाले नंतरच देयके संबंधित संस्थांना अदा करण्यात आली.

प्रशिक्षणार्थीची खोटी संख्या वाढवून प्रशिक्षण न देताच बिले अदा करण्यात आलेली नाहीत. सदर प्रकरणाची तपासणी करण्यात आलेली आहे. तपासणीअती पात्र लाभार्थ्यांची देयके अदा करण्यात आलेली आहेत. खोटे दस्तऐवज व खोटी संख्या वाढवून प्रशिक्षण न देताच देयके अदा करण्यात आलेली नाहीत.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मानव विकास कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिलांना मजुरीच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(३०) * ३४०७ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या निष्क्रियतेमुळे मानव विकास कार्यक्रमांतर्गत गर्भवती महिलांना मागील चार पाच महिन्यापासून बुडीत मजुरीच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जून, 2014 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गर्भवती महिलांना देण्यात येणारी बुडीत मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी मानव विकास कार्यक्रमातर्गत "गर्भवती महिलांना बुडीत मजूरी देणे" या योजने अतंर्गत लाभार्थी महिलांच्या आकडेवारीचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर केला असून त्यास जिल्हाधिकारी, ठाणे यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तथापि, मानव विकास कार्य्रक्रमांतर्गत निधीचे वितरण दोन टप्प्यात करण्यात आल्यामुळे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.१०/११/२०१४ च्या आदेशानुसार लाभार्थी महिलांना बुडीत मजूरी देणेकरीता रु.१२४.०० लक्ष इतके अनुदान BDS व्दारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे यांच्याकडे वर्ग केले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही .

-----------------

**किनवट (जि.नांदेड) येथील पंचायत समिती अतंर्गत शौचालय बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(३१) * ३१३१ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) किनवट तालुक्यातील (जि.नांदेड) पंचायत समिती अतंर्गत शौचालय बांधकाम प्रोत्साहन निधीत झालेल्या कोट्यवधी रूपयांची अनियमिततेची चौकशी करण्याचे आदेश

गटविकास अधिका-यांना जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, ग्रामसेवकांनी ग्रामविस्तार अधिका-याच्या सहमतीने शौचालयाचे बांधकाम केल्याचे कागदोपत्री दाखवून कोट्यवधी रूपयांचा निधी चा अपहार केला, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याप्रकरणी झालेल्या चौकशीत काय आढळले, दोषीविरूध्द काय कारवाई झाली अथवा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) किनवट तालुका (जिल्हा नांदेड) अतंर्गत शौचालय बांधकामाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीसंदर्भात चौकशी करण्याचे आदेश उपमुख्य कार्यवाही अधिकारी यांनी दिले आहेत हे खरे आहे.
(२) सदर तक्रार अर्जाची चौकशी सद्य:स्थिती सुरु आहे.
(३) चौकशीअती अपहार झाल्याचे आढळून आल्यास संबंधिताविरुध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वन कर्मचारी वसाहतीची झालेल्या दुरवस्थेबाबत

**(३२) * २३७७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात २० ते २५ वर्षापूर्वी जास्त जंगल असलेल्या पट्ट्यात वनकर्मचारी व वनरक्षकांना राहण्यासाठी बांधलेल्या वसाहती व निवासस्थाने यांची दुरवस्था झालेली असून तेथे कोणीही कर्मचारी राहत नसल्याची बाब माहे, ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(2) असल्यास, वनकर्मचारी नसल्यामुळे त्याठिकाणी जंगलतोड व चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,
(5) अद्यापी कार्यवाही केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (1) हे अशंत: खरे आहे.
मौजे मुरबाड, सोमटा, मेंढवण व कैनाड या गावातील वन वसाहतीची पडझड झालेली आहे.
(2) हे खरे नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जोडमोहा वनपरिक्षत्र (ता.जि.यवतमाळ) अतंर्गत मार्तंडा परिक्षत्रात वनाधिका-यांच्या संगनमताने कोट्यवधी रूपयांची झालेली वृक्षतोड दडपण्याचा झालेला प्रकार.

**(३३) * ३९८ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे जोडमोहा वनपरिक्षत्र (ता.जि.यवतमाळ) अतंर्गत मार्तंडा परिक्षत्राच्या राखीव वनातील परिपक्व सागवान वृक्षांची विनापरवानगी कोट्यवधी रूपयांची वृक्षतोड करून लाकूड साठ्या चोरी केल्याची घटना दिनांक 6 ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त जंगलात झालेल्या नियमबाहय वृक्षतोडीची पाहणी करण्यासाठी उपवनसंरक्षक यवतमाळ यांचेकडून उपवनसंरक्षक दक्षता पथक, सहाय्यक उपवनसंरक्षक, वनपरिक्षत्र अधिकारी यांना तपासणी करून अहवाल सादर करण्यासंदर्भात आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न क्र.2 च्या अनुषंगाने पाहणीअती वृक्षतोड झाली नसल्याचा दिशाभूल करणारा अहवाल उपवनसंरक्षक यांच्याकडे सादर करण्यात आला आहे काय,

(4) असल्यास, प्रश्न क्र.3 च्या अनुषंगाने पांढरकवडा वन विभागातर्फे करण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये वृक्षतोड झाल्याची घटना निदर्शनास आली, हेही खरे आहे काय,

(5) असल्यास, उक्त प्रकरणी दिशाभूल करणारा अहवाल सादर करणा-या तस्करांसोबत संगनमत करून वनसंपत्तेचा -हास करणा-या वनाधिकारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येणार आहे आणि त्याचे स्वरूप काय आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही, तथापि ८ ते १० ऑक्टोबर २०१४ या कालावधीत केलेल्या मार्तंडा नियतेक्षत्राच्या बीट तपासणीत ३५ सागवान वृक्षांची अवैध वृक्षतोड निदर्शनास आली असून त्याच्या नुकसानीची किंमत रु.४१,५२८ इतकी आहे. घटनास्थळावरुन १.३०९ घ.मी.इतका माल जप्त केला असून जप्त मालाची किंमत रुपये २६,८५५ इतकी आहे.

(२) मुख्य वन संरक्षक यांचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये विभागीय वनाधिकारी (दक्षता) यांना चौकशीचे आदेश देण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही तथापि विभागीय वनाधिकारी (दक्षता) यांच्या कार्यालयामार्फत सहाय्यक वन संरक्षक, पांढरकवडा यांनी जोडमोहा वन परिक्षत्रातील पहूर बीटाची ९ ते १० ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत केलेल्या तपासणीत 43 सागवान झाडांची अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले. त्याच्या नुकसानाची किंमत रु.४६,२५७ इतकी आहे. घटनास्थळावरून २४ सागवान नग जप्त केले असून जप्त मालाची किंमती रुपये १९,५६६ इतकी आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भावत नाही.

-----------------

**सातारा जिल्हयात महसूल विभाग सुमारे २८०० हेक्टर असणारे वन विभागाचे`क्षत्र पुन्हा वन विभागाकडे घेणेबाबत.**

**(३४) * २९९३ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) सातारा जिल्हयात वन विभागाचे सुमारे २८०० हेक्टर`क्षत्र हे महसूल विभागाकडे आहे, हे खरे आहे काय

(2) असल्यास, ब्रिटीश काळापासून वनविभागाच्या जमीनी भूमिहीनांना कसण्यासाठी दिल्या आहेत, विशेषत: या जमिनीवर पाटण तालुक्यातील अनेक व्यवसायिकांनी ताबा

मिळविला असून अनेकांनी वनविभागाची जमिनही ताब्यात मिळविण्याकरिता प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त जमिनीवर अनधिकृतपणे व्यवसाय सुरू केले असून या जमिनी परत वन विभागाकडे देण्यास हे व्यवसाईक आता तयार नाहीत अशा व्यवसाईकांच्याकडून या जमिनी पुन्हा ताब्यात घेऊन वनविभागाने आपल्या ताब्यात घेणे आवश्यक असताना अनधिकृत वनविभागाच्या जमिनी बळकावणाऱ्या व्यवसाईकांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) नसल्यास, महसूल विभागाकडे वन विभागाच्या असणारे सुमारे २८०० हेक्टर जमिन क्षेत्र पुन्हा वनविभागाकडे घेणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय, अद्याप याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला नसल्यास, निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वनविभागातील अभिलेख्यानुसार १९२३.७९ हेक्टर राखीव वन महसूल खात्याचे ताब्यात आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी यांनी भूमिहीनांना काही विशिष्ट अटी, शर्तीवर कसणेसाठी जमिनीचे वाटप केलेले आहे. जमिनीचा ७/१२ उतारा संबंधितांच्या नावावर आहे. अशा वाटप केलेल्या जमिनीवर वन विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. पाटण तालुक्यातील अनेक व्यवसायिकांनी कब्जा मिळविला किंवा कसे याबाबत महसूल विभागाकडून खात्री करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) महसूल विभागाकडे ताब्यात असलेले १९२३.७९ हेक्टर राखीव वन वनविभागाच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

-----------------

**संघातील उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यांचा समावेश मानवी विकास योजनेअतर्गत करण्याबाबत**

**(३५) * १६६६ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लातुर जिल्ह्यातील उदगीर विधानसभा मतदार संघातील उदगीर व जळकोट तालुक्यांचा समावेश मानवी विकास योजनेअतंर्गत करण्याबाबत लोकप्रतिनिधी (उदगीर) यांनी माजी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे अनेक वेळा निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उदगीर व जळकोट तालुक्याचा समावेश मानवी विकास योजने अतंर्गत करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(3) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
राज्यातील अतिमागास २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी मानव विकास योजना राबविण्यात येत असून शासन निर्णय नियोजन विभाग, दि.19/07/2011 मध्ये विहित निकषांनुसार निवडण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये उदगीर व जळकोट या तालुक्यांचा समावेश नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक पंचायत समितीतील झालेल्या गैरव्यवहाबाबत.**

**(३६) * ३४१३ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक पंचायत समितीतील झालेल्या गैरव्यवहाराची सर्व रक्कम दोषी व्यक्तीकडून वसुल करण्याचा आदेश विभागीय आयुक्त यांनी माहे मे, 2013 मध्ये वा त्या दरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, दोषी व्यक्तीकडून गैरव्यवहाराची रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) वेतन निश्चिती करतांना अतिप्रदान झालेली रककम वसुल करण्याबाबत विभागीय आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत.
(२) व (३) अतिप्रदानाच्या एकूण रुपये ५४,३३,४५५/- एवढ्या रक्कमेपैकी रुपये ४१,८०,६३०/- एवढी रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरित रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे. या व्यतिरिक्त वेतन निश्चिती करताना चुक करणा-या चार कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

**जालना जिल्हा परिषदेच्या सौर पथदिवे खरेदीच्या गैरव्यवहाराबाबत.**

**(३७) * ३६६५ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) जालना जिल्हा परिषदेच्या दलितवस्ती योजनेंतर्गत सुमारे साडेपाच कोटी रुपये खर्चून खरेदी करण्यात आलेल्या सौर पथदिव्या मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने ज्या एजन्सी बरोबर दर करार निश्चित करण्यात आलेला आहे त्यांच्याकडून सौर पथदिवे खरेदी करावे किंवा जाहिर निविदा मागवून खरेदी करावी असे स्पष्ट निर्देश असतानांही सौर पथदिव्यांची खरेदी करतांना बहुतांशी गावांनी शासनाचे आदेश धाब्यावर बसवून खरेदीची प्रक्रिया पूर्ण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय आणि त्यात काय आढळून आले,
(4) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) चार गावे वगळता सर्व गावांनी मेडाच्या दर करार यादी समाविष्ठ असलेल्या एजन्सीकडूनच खरेदी केलेली आहे. सदर चार गावे अनुक्रमे कोठी, ता.घनसावंगी, आणि परतूर तालुक्यातील वाहेगाव श्रीष्टी रायगव्हाण व गोळेगाव यांनी जिल्हा दरसूचीप्रमाणे खरेदी केलेली आहे.
(३) दि.२०.११.२०१४ च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे आदेशान्वये जिल्हा परिषद अंतर्गत सर्व पंचायत समिती स्तरावरील `क्षत्रीय

अधिकारी (कृषी विस्तार अधिकारी (कृषि/पंचायत), शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता) यांचेमार्फत तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये ३२ गावांत दिवे बंद असणे, दिवे वस्तीबाहेर लावणे, पुरवठादाराकडे ग्रामपंचायतीनी मागणी केल्याचा दिनांक नसणे, माहिती उपलब्ध करुन न देणे इ.त्रुटी आढळून आल्या आहेत.
(४) व (५) ३२ गावात आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने संबंधित ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली असून त्यापैकी ४ ग्रामसेवकांचा समाधानकारक खुलासा प्राप्त झालेला आहे. उर्वरित २८ ग्रामसेवकांवर खुलासा सादर न केल्याने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.